महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ५५

# महाराजा सयाजीराव आणि बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस

पवन साठे



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ५५

# महाराजा सयाजीराव
# आणि
# बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस

पवन साठे

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव आणि
बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
इतिहास
पवन साठे
●
प्रकाशन क्रमांक - ७५
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : पवन साठे
वारणा बझार समोर, घुणकी
ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर - ४१६११२
मो. ७८८७३३२२२२
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : २५ रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/
  101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/
  1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# महाराजा सयाजीराव
# आणि
# बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस

महाराजा सयाजीराव म्हणजे वास्तुकला, शिल्पकला, चित्रकला यांचे वैश्विक भान असणारे जाणकार होते. १८८७ च्या पहिल्या परदेशवारीपासूनच ते या कलांचा तुलनात्मक विचार करत होते. त्यांच्याकडे नावीन्याची ओढ होती. जे काम करायचे ते सर्वोत्तम झाले पाहिजे ही दृष्टीसुद्धा होती. त्यामुळे महाराजांच्या कारकीर्दीत महाराजांच्या काळात उभारलेल्या सर्वच वास्तू वास्तुकलेचा आणि सौंदर्यदृष्टीचा सर्वोच्च आविष्कार होता. १८८१ ला महाराजांना राज्याधिकार प्राप्ती झाली. त्या अगोदर एक वर्ष या राजवाड्याचे बांधकाम खास त्यांच्यासाठी सरू करण्यात आले. आजही या वास्तू जगभरातील पर्यटकांचा आकर्षणाचा विषय आहे.

महाराजा सयाजीराव गायकवाड यांची कारकीर्द समजून घेण्याच्या प्रवासातील प्रत्येक दिवस महाराजांच्या व्यक्तिमत्त्वातील नव्या पैलूंचे दर्शन घडवितो. या प्रवासातील अनेक टप्पे सुखद आनंद देऊन जातात, तर काही टप्पे प्रतिभावंत राजाची ओळख करून देतात. सयाजीरावांनी त्यांच्या ५९

वर्षांच्या प्रशाकीय कारकीर्दीत बडोदा संस्थानात अनेक वास्तूंची निर्मिती केली. या वास्तूंच्या निर्मितीमध्ये त्यांच्या परदेश प्रवासाचे प्रतिबिंब जागोजागी निदर्शनास येते. महाराजांच्या प्रत्येक नवनिर्मितीमागील बहुउद्देशीय कल्पना आणि त्यातील नावीन्यता आजही सर्वांना आकर्षित करतात. याचाच एक उत्तम नमुना म्हणजे बडोद्याचा लक्ष्मीविलास राजवाडा. १४२ वर्षांपूर्वी बडोद्याच्या जगप्रसिद्ध लक्ष्मीविलास राजवाड्याची पायाभरणी झाली होती. हा राजवाडा म्हणजे आधुनिक भारताचा नवा मानदंड निर्माण करणाऱ्या अनेक उपक्रमांची 'पंढरी' आहे.

## लक्ष्मीविलास राजवाड्याची पायाभरणी

लक्ष्मीविलास राजवाड्याच्या बांधकामास १२ जानेवारी १८८० मध्ये सुरुवात झाली. दहा वर्षांनंतर १० फेब्रुवारी १८९० रोजी सयाजीराव या राजवाड्यात वास्तव्यास गेले. इंग्लंडच्या महाराणी एलिझाबेथ दुसऱ्या यांच्या Buckingham Palace, England च्या चौपट मोठा हा राजवाडा आहे. हा लक्ष्मीविलास राजवाडा एकूण ७४४ एकर इतक्या जागेवर विस्तारला आहे. राजवाड्याच्या मनोऱ्याची उंची अंदाजे २०४ फूट असून राजवाड्याचे एकूण क्षेत्रफळ ६०,००० स्क्वेअर फूट आहे. राजवाड्याची उत्तर दक्षिण लांबी ५१२ फूट असून पूर्व-पश्चिम रुंदी २०० फूट आहे. १९ व्या शतकात तत्कालीन ब्रिटिश भारतात पौरात्य पद्धतीने बांधलेली राजवाड्याची एवढी मोठी इमारत इतर कुठेही आढळत नाही. महाराजांच्या पहिल्या पत्नी

लक्ष्मीबाई (महाराणी चिमणाबाई पहिल्या) यांचा यादरम्यान १८८५ मध्ये मृत्यू झाला. त्यांची आठवण म्हणून या राजवाड्याला 'लक्ष्मीविलास' हे नाव देण्यात आले.

## राजवाड्याची अंतर्गत रचना

इंडो-सार्सेनिक स्थापत्यशैलीवर आधारलेला लक्ष्मीविलास राजवाड्याचा आराखडा मेजर चार्ल्स मॉन्ट या ब्रिटिश अभियंत्याने तयार केला होता. हा आराखडा तयार करताना राजवाड्याच्या सभोवतालच्या नैसर्गिक पर्यावरणाला धक्का लागणार नाही याची काळजी मॉन्ट यांनी घेतली होती. चार्ल्स मॉन्ट यांच्या नेतृत्वाखाली राजवाड्याचे बांधकाम चालू असतानाच दुर्दैवाने त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूनंतर बडोद्याचे इंजिनिअर रॉबर्ट चिस्लो यांना राजवाड्याचे उर्वरित काम सोपवण्यात आले. १७० खोल्या असणारा लक्ष्मीविलास राजवाडा तीन भागांमध्ये विभागण्यात आला होता. पहिल्या भागात दरबार हॉल, डॉक्टरांचे कार्यालय, अभ्यागत कक्ष, बिलियर्ड रूम इ.चा समावेश होता. दुसरा भाग महाराजांसाठी राखीव होता. तर तिसऱ्या भागात महिलांसाठीची व्यवस्था करण्यात आली होती. त्याचबरोबर सयाजीरावांनी आपल्या राजवाड्यामध्ये भारतातील पहिली विजेवर चालणारी लिफ्टदेखील बसवली.

राजवाड्याच्या दक्षिण भागात मध्यभागी एक कारंज्याचा चौक आहे. बहुतेकदा महाराजांचे वास्तव्य या भागातच असे. वरच्या मजल्यावर भव्य ग्रंथसंग्रहालय, डायनिंग हॉल, दिवसा

राहण्यासाठी ख़ासगी दालने असून दुसऱ्या मजल्यावर शयनागार आणि राजपाहुण्यांची दालने आहेत. महाराजांच्या विभागाच्या दक्षिण भागी महाराणी चिमणाबाईंचे निवासस्थान होते. त्याचे प्रवेशद्वार स्वतंत्र ठेवण्यात आले होते. तसेच त्यांना स्वतंत्र दिवाणखाना होता. तो लक्ष्मीविलास पॅलेसचा चौथा मुख्य भाग होय. तसेच याच राजवाड्यात दवाखाना, जमादारखाना, बिलियर्ड रूम, गादी महल हे राजवाड्याच्या पूर्व भागात होते.

राजवाड्याच्या बांधकामासाठी आग्रा येथील लाल दगड, पुणे येथील निळे दगड आणि राजस्थानमधील संगमरवरी दगडांचा वापर मोठ्या प्रमाणावर करण्यात आला होता. राजवाड्यातील भिंतीवर प्लास्टर करण्यासाठी मद्रासहून कामगार बोलवण्यात आले होते. दरबार हॉलमध्ये व्हेनेशियन पद्धतीचे संगमरवरी दगडावरील नक्षीकाम बसवण्याचे काम व्हेनिसमधील मुरानो कंपनीचे १२ कामगार १८ महिने करत होते. दरबार हॉलमधील खांब, दरवाजे आणि जिन्याच्या पायऱ्यांवर बसवण्यासाठी काराराा प्रकारचा संगमरवर दगड आयात करण्यात आला होता. लक्ष्मीविलास राजवाड्याच्या बांधकामात करण्यात आलेला काचेचा वापर हा तत्कालीन भारतातील एखाद्या वास्तूसाठीचा सर्वात जास्त वापर होता. रंगकाम केलेल्या या काचांवर भारतीय पौराणिक कथांची चित्रमालिका रेखाटण्यात आली होती.

युरोपप्रवासात सयाजीरावांनी पाहिलेल्या खाजगी वापराच्या विविध पाश्चात्य वस्तू व राहणीमानाच्या विविध पद्धतींचे

राजवाड्यातील उभारणीसाठी फेब्रुवारी १८९० मध्ये खानगी अधिकारीपदी पेस्तनजी दोराबजी यांची नियुक्ती झाली. राजवाड्यातील पाश्चात्य पद्धतीचे फर्निचर, ड्रेसिंग रूम, बाथरूम, डायनिंग टेबल, विजेचे दिवे, वैशिष्ट्यपूर्ण मातीची भांडी या सर्व बाबी पेस्तनजींनी स्वत:च्या कारकीर्दीत अतिशय उत्तम पद्धतीने उभ्या केल्या. बांधकाम पूर्ण झाल्यावर लक्ष्मीविलास राजवाड्यातील फर्निचर तयार करण्याची सर्वांत महत्त्वाची कामगिरी पेस्तनजी यांनीच पार पाडली.

लक्ष्मीविलास पॅलेसमधील दरबार हॉलमध्ये संगीत मैफिली आणि इतर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जात होते. हॉलच्या पहिल्या मजल्यावर तीन बाजूंच्या गॅलरी स्त्रियांसाठी राखीव ठेवण्यात आल्या. या गॅलरीमध्ये बसून राजघराण्यातील स्त्रियांनी झरोक्यातून दरबार हॉलमधील कार्यक्रम बघण्याची सोय होती. सयाजीरावांच्या विवाहानंतर त्यांच्या पहिल्या पत्नी महाराणी चिमणाबाई (पहिल्या) यांच्यासोबत तंजावरमधील भरतनाट्यमच्या कलावंतांचा ताफा बडोद्यात आला होता. लक्ष्मीविलास राजवाड्याच्या दरबार हॉलमध्ये या कलावंतांचा कार्यक्रम अनेकदा आयोजित करण्यात आला होता.

## राजवाड्यातील सजावट

राजा रवी वर्मा हे केरळमधील महान चित्रकार होते. बडोद्याचे दिवाण सर टी. माधवराव यांनी त्यांना बडोद्यात आणले. त्यावेळी लक्ष्मीविलास राजवाड्याचे बांधकामही संपत आले

होते. राजवाड्याचा दरबारगृह सजवण्यासाठी महाराजांना राजा रवी वर्माकडून काही तैलचित्र तयार करून हवी होती. त्यात भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या रामायण, महाभारत, पुराणे यातील कथांवर आणि प्रसंगांवर आधारलेली चित्रे त्यांना अपेक्षित होती. त्याच वेळी राजवाड्याच्या दरबार हॉलसाठी १२-१४ चित्रांची आवश्यकता सर टी. माधवरावांनी व्यक्त केली. ही चित्रे काढण्यासाठी भारतभर अभ्यास पर्यटन करावे लागणार होते. यासाठी राजा रवी वर्मा आपले बंधू राज वर्मा यांना सोबत घेऊन ३-४ महिने भारत भ्रमंती करून आपल्या मूळगावी किलीमानूरला आले. परंतु या चित्रांसाठीचा त्यांचा अभ्यास समाधानकारक झाला नव्हता. ते थोडे निराश झाले. परंतु त्यांचे चित्रकार मामा राज वर्मा यांनी त्यांना 'तुझ्या कल्पनेप्रमाणे तू रामायण, महाभारत सादर कर' असा सल्ला दिला.

राजा रवी वर्मांनी या कामाला स्वतःला झोकून दिले. पौराणिक कथेतले एक एक चित्र पूर्ण करत चौदा चित्रे पूर्ण झाली. त्यासाठी त्यांनी व्यास-वाल्मीकी, नल-दमयंती, अर्जुन-सभा द्रौपदीवस्त्रहरण, हरिश्चंद्र-तारामती, सीतास्वयंवर, देवकी-कृष्ण, असे अनेक विषय निवडले होते. ही चित्रे पूर्ण झाली तेव्हा त्या कलाकृतींची त्रिवेंद्रममध्ये खूप चर्चा झाली. त्रिवेंद्रम महाराज आणि बडोद्याचे महाराज यांच्या परवानगीने त्या चित्रांचे प्रदर्शन प्रथम त्रिवेंद्रममध्ये भरविले गेले या प्रदर्शनाला शेकडो लोकांची गर्दी झाली. येणाऱ्या लोकांनी देवांची चित्रे म्हणून भाविकपणे

चित्रांसमोर डोके टेकवून नमस्कार केले. त्रिवेंद्रमनंतर राजा रवी वर्मा मुंबईला आले. महाराजा सयाजीरावांच्या परवानगीने त्यांनी मुंबईत त्या चित्रांचे प्रदर्शन भरविले. मुंबईत हजारो लोकांनी ही चित्रे पाहिली आणि त्या चित्रांचे काढलेले फोटो भारतभर वाटले गेले.

ही चित्रे घेऊन राजा रवी वर्मा बडोद्याला आले. महाराजांनी त्यांना संपूर्ण राजवाडा फिरून दाखवला. ज्या ठिकाणी ही चित्रे लावायची होती तो दरबार हॉलही दाखवला. दरबार हॉलमध्ये कोणते चित्र कोठे लावायचे हे स्वातंत्र्य महाराजांनी रवी वर्मांना दिले. राजा रवी वर्मांच्या इच्छेनुसार दरबार हॉलमध्ये चित्रे लावण्याअगोदर बडोद्यातील लोकांसाठी त्यांचे प्रदर्शनही ठेवण्यात आले. महाराजांनी या कृष्णधवल चित्रांचे रंगीत करून विकण्याची कल्पना राजा रवी वर्मांना दिली. महाराजांची ही कल्पना किती महान होती याचा प्रत्यय आज येतो. कारण ही चित्रे आज भारताबरोबर सर्व जगभर प्रसिद्ध आहेत. या चित्र मालेत पुढील चौदा चित्रांचा समावेश होतो. १. श्रीरामचंद्राचा विवाह २. श्रीकृष्णाची दृष्ट ३. गंगा आणि शंतनू ४. कारागृहातून श्रीकृष्णाला वासुदेव घेऊन निघतो ५. मत्स्यगंधा ६. विश्वामित्र मेनका ७. कीचक आणि सैरंध्री ८. हरिश्चंद्र तारामतीच्या वधास उद्युक्त झाला आहे. ९. राधामाधव १०. भरत ११. कंस आणि माया १२. यतिवेषधारी अर्जुन आणि सुभद्रा, १३. नलदमयंती, १४. द्रौपदी वस्त्रहरण.

## लक्ष्मीविलास पॅलेसमधील शिल्पकला

राजवाड्याचा दर्शनी भाग शिल्पकलेने ओतप्रोत भरला आहे. हे शिल्पकाम मिश्र स्वरूपात केलेले दिसते, त्यात हिंदी शिल्पकला पद्धत वापरली असून, यातील काही कमानीत व्हेनिसची शिल्पकला व काही गॉथिक शिल्पकलेचा मिलाप बघावयास मिळतो. मुख्य दरबाराच्या दिवाणखान्याची फरशी व्हेनिसच्या पद्धतीची असून त्यावर इटालियन शिल्पकार फेलिसी याने चित्रकला, काव्यकला, मूर्तिकला व शिल्पकला या चार ललितकलांचे दर्शक पुतळे उभे केले होते, मुख्य दरवाजाला महिरप नोट आहे. त्यावरही सुंदर कोरीव काम केलेले आहे, दरवाजाची जी महिरप आहे तिच्यातील समांतरपणा, त्याच्यावर असलेले कोरीव काम अप्रतिम आहे.

हा इटालियन शिल्पकार फेलिसी १८९३ मध्ये महाराजांनी बडोद्यास आणला होता. पुढे १८९७ पर्यंत त्याला बडोद्यात ठेऊन घेतले. त्याच्याकडून आरसपानाचे व ब्रॉंझचे पुतळे तयार करून घेऊन राजवाड्यात ठेवले आहेत. फेलिसीने महाराणी साहेबांचा उत्कृष्ट पूर्णाकृती पुतळा केला आहे. महाराजांचे वडील काशीराव गायकवाड यांची ब्राँझ धातूची पूर्णाकृती बैठी मूर्ती पर्यटकांना फारच आकर्षित करते. ही मूर्ती बनविताना काशीरावांच्या व्यक्तिमत्त्वातील बारकावे हुबेहूब टिपल्याचे दिसतात. तसेच महाराजांचे चिरंजीव फत्तेसिंहराव व जयसिंहराव यांचाही ब्राँझचा जोड पुतळा तयार केला आहे.

याशिवाय लक्ष्मीविलास राजवाड्याच्या मुख्य पोर्चमध्ये पाणी वाहणारा भिस्ती, नाचणारी बाई, दोन चित्ते व त्यांना पाळणारे रक्षक, सारंगीवाला व एक संन्याशी यांचे पुतळे भर आकाराचे उभे ठेवले आहेत. मुख्य दरबारच्या दिवाणखान्यात या राज्यातील पूर्वीचे दिवाण काजी शहाबुद्दीन, लक्ष्मण जगन्नाथ व मणिभाई जसभाई यांचे अर्धपुतळे ठेवले आहेत. त्याचप्रमाणे बयाबाईसाहेब घाटगे व बाजीरावसाहेब घाटगे यांचे अर्धपुतळेही त्याच कुसरीचे आहेत. पण या सर्वांपेक्षा फेलिसीचा सर्वांत सुंदर पुतळा म्हणजे 'हातात बंदूक घेतलेला अरब शिकारी' याचा होय. तो मुख्य जिन्याच्या कठड्यावर उभा केला आहे. तो कलेच्या दृष्टीने फारच सुंदर साधला आहे. या सर्व पुतळ्यांबरोबर लक्ष्मी विलास पॅलेसच्या हिरवळीवरदेखील परदेशातून आणलेली अनेक आकर्षक शिल्पे ठेवण्यात आलेली आहेत. लक्ष्मीविलास राजवाड्यासमोरील संगमरवरी मयूर शिल्प, इजिप्तचा मदर स्टॅच्यू, हत्तींच्या जोडीचा पुतळा अशी अनेक शिल्पे पर्यटकांचा विशेष आकर्षणबिंदू ठरतात.

## राजवाड्याचे बाह्यरूप

राजवाडा बाहेरून संपूर्ण दगडी बांधकाम करून बांधला आहे. त्यामुळे उन्हाळ्यात आतील भाग उष्णतेने गरम होऊ नये म्हणून पुढील भागास व मागील बाजूस असंख्य कलात्मक मोठमोठ्या खिडक्या ठेवलेल्या आहेत. राजवाड्याच्या मुख्य दरवाजाच्या दोन्ही बाजूस नक्षीदार जाळी असून, त्यावर अगदी छोटे सज्जे

आहेत. ही जाळी बघताना आग्रा येथील ताजमहालाची आठवण आल्याशिवाय राहत नाही. तिथे खिडक्या असून त्यावर उत्कृष्ट दगडी कोरीवकाम केलेले दिसते. दरवाजाच्या दोन्ही बाजूला असलेले दोन उंच मनोरे व त्याला असलेल्या चौफेर बालकन्या (Balconies) तर प्रवेशद्वाराच्या सौंदर्यात आणखीनच भर घालतात. मध्यभागी असलेल्या अर्धगोलाकृती घुमटाच्या टोकावर मध्यभागी असलेला काठीवरील डोलणारा भगवा झेंडा गायकवाड सरकार राजमहालात हजर असल्याची साक्ष देतो. राजवाड्याभोवती सुंदर बगिचा असून, मध्यभागी बरेच मोठे कारंजे आहेत. सगळा बगिचा सुंदर फुलांनी सुशोभित केला असून, ठरावीक अंतरावर संगमरवराच्या बसण्याकरिता बैठकी आहेत. हा विस्तीर्ण बगिचा मि. गोल्डरिंग यांनी बनविला होता. या बागेत फेलीसी या शिल्पकाराने तयार केलेली अनेक पुतळे आणि शिल्पे अतिशय कलात्मकतेने बसविण्यात आली आहेत.

एकूण राजवाडा आतून किती भव्य आणि कलासंपन्न असेल याची मुख्य प्रवेशद्वारावरून कल्पना येते. पूर्वी सकाळ-संध्याकाळ या प्रवेशद्वारावर सनईचौघडांचे मंजूळ स्वर ऐकू येत असत. राजदरबाराचे मुख्य चार भाग आहेत. पहिला भाग राजदरबाराकरिता असून, दरबाराच्या लोकांना आत जाण्यासाठीचे प्रवेशद्वार उत्तरेस आहे. दरबार हॉलची लांबी ९४ फूट व रुंदी ५४ फूट आहे. संपूर्ण राजवाडा दोन मजल्यांचा आहे, पूर्वेकडील बाजू ही सिंहासनाकरिता आहे. चर्चमध्ये जशा

उंच उंच खिडक्यांना रंगीत काचा लावलेल्या असतात तशाच रंगीत काचा दरबार हॉलच्या पूर्वेकडील खिडक्यांवर देवांच्या तसबिरी पाहावयास मिळतात. यामध्ये यशोदाकृष्णाच्या दोन, रामपंचायतन व विष्णूपंचायतन अशा चार तसबिरी खास विलायतेहून तयार करून आणल्या होत्या. भव्य व प्रशस्त अशा मुख्य दरबारच्या दिवाणखान्यामध्ये एकही खांब नाही. लक्ष्मीविलास राजवाड्यातील वास्तुकलेचा हा अद्भुत नमुना आहे. याचबरोबर राजवाड्यामध्ये अजिंठा लेणींची छाप असणारा वीणा कक्ष उभारण्यात आला होता. दरबार हॉलच्या भिंतींना संगमरवरीसारखे गुळगुळीत प्लास्टर, राजवैभवास साजेसे मोझॅकचे काम, सोनेरी बर्खाने सुशोभित केलेले छतावरचे काम आणि राजा रवी वर्मांच्या पौराणिक रंगीत पेंटिंगमुळे दरबार हॉल भारतीय प्राचीन संस्कृतीच्या राजवैभवाने आकर्षित करतो.

## सत्यशोधकांशी जिव्हाळा

सयाजीरावांनी आपल्या कारकीर्दीत सत्यशोधक चळवळीला खंबीर पाठबळ दिले. महाराजांचे सत्यशोधक चळवळीतील नेते आणि कार्यकर्ते यांच्याशी अत्यंत जिव्हाळ्याचे नाते होते. स्वामी रामय्या व्यंकय्या अय्यावारू हे सत्यशोधक एक नामांकित कंत्राटदार होते. लक्ष्मीविलास राजवाड्याच्या बांधकामाचे कंत्राट सयाजीरावांनी अय्यावारू यांना दिले होते. गुणवत्ता आणि विचारधारा हे दोन निकष महाराजांनी आपल्या कारकीर्दीच्या आरंभापासूनच जोपासल्याचा हा उत्तम पुरावा आहे.

१८९८ मध्ये सयाजीरावांच्या अध्यक्षतेखाली लक्ष्मीविलास राजवाड्यामध्ये 'ग्रंथ संपादक मंडळी'चा पहिला वार्षिक समारंभ साजरा झाला. १७ फेब्रुवारी १९३० रोजी महाराजांनी लक्ष्मीविलास पॅलेसमध्ये सत्यशोधक समाजाच्या काही कार्यकर्त्यांची व्याख्याने लोकांसाठी मुद्दाम ठेवली होती. त्यावेळी महाराज स्वत: हजर होते. यामध्ये एक सत्यशोधक नारो बाबाजी महागट यांना मदत म्हणून २०० रु. रोख दिले. वासुदेव लिंगोजी बिर्जे हे सत्यशोधक सयाजीरावांच्या पॅलेस लायब्ररीचे ग्रंथपाल होते. त्यांचे 'क्षत्रिय व त्यांचे अस्तित्व' हे पुस्तक सयाजीरावांच्या आश्रयानेच प्रकाशित झाले.

## धर्मसमन्वयाचा अनोखा मानदंड

लक्ष्मीविलास राजवाड्याच्या सभोवतालची ६५० एकर जागेतील बाग तयार करताना ब्रिटिश, युरोपियन, फ्रेंच, हिंदू, मुघल व रजपूत बाग निर्मिती शैलींचा विपुल प्रमाणात वापर केला होता. फ्रेंच बॅरोक शैलीतील बागेत स्थानिक वृक्षांचा वापर करून फ्रेंच देखावा तयार करण्यात आला. राजवाड्याची बाहेरील बाजू संपूर्णपणे दगडी बांधकाम केलेली आहे. सयाजीरावांनी लक्ष्मीविलास राजवाड्याच्या शिखरावर हिंदू, इस्लाम, ख्रिश्चन यांसह ७ धर्मांची तत्वे कोरून घेतली होती. बांधकाम पूर्ण झाल्यानंतर सयाजीरावांनी या राजवाड्याचे केलेले कौतुकच लक्ष्मीविलास पॅलेसचे अनन्यत्व सिद्ध करते. महाराज म्हणतात, "पॅलेसचे बांधकाम व कलाकुसर मात्र उजवी आहे. अर्थात लक्ष्मी

विलास पॅलेस हा भारतीय संस्कृतीच्या विविधतेतील एकतेचे दर्शन घडविणारा झाला आहे, याचे आम्हाला समाधान आहे. आर्किटेक्ट्सने पॅलेसच्या बांधकामातील शिखर स्थानाच्या रचना अनुक्रमे हिंदू, शीख, मुस्लिम आणि ख्रिस्ती वास्तुकलेच्या प्रतीकांना अनुसरून केली आहे."

## अस्पृश्यांचा सन्मान करणारा राजवाडा

१६ मार्च १९०५ ला राजपुत्र धैर्यशीलराव आणि इतर सात मुलांची मुंज लक्ष्मीविलास राजवाड्यात झाली. २३ जानेवारी १९१० रोजी सयाजीरावांनी बडोद्यातील सर्व अस्पृश्य विद्यार्थ्यांना राजवाड्यात मोठी मेजवानी दिली. १९११-१२ मध्ये अनाथ आश्रमातील ५ किंवा ६ मुलींना संगीत शिक्षणासाठी राजवाड्यावर पाठविण्यात यावे असा महाराजांनी हुकूम केला. १९१२ मध्येच सयाजीरावांनी अस्पृश्यांच्या सर्व मुलांना लक्ष्मीविलास राजवाड्यात जमवून खाऊ वाटला होता. यावेळी पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या इंदूरचे महाराज तुकोजीराव होळकर यांनी हा प्रकार आवडल्यामुळे एक हजार रुपये शिष्यवृत्तीसाठी दिले. १९२५ मध्ये सयाजीरावांनी आपल्या लक्ष्मीविलास राजवाड्यात सर्व जातीयांसाठी सहभोजनाचे आयोजन केले होते. सयाजीरावांनी वेगवेगळ्या प्रांतातील व जातीधर्मांचे पदार्थ राजवाड्यात बनवले जावेत यासाठी मुसलमान, पारसी, मद्रासी, हिंदुस्थानी आणि फ्रेंच इ. स्वयंपाकी राजवाड्यातील स्वयंपाकघरात नेमले होते. सामाजिक समन्वयाचा प्रयोग या

स्वयंपाक्यांच्या माध्यमातून सयाजीरावांनी स्वत:च्या स्वयंपाक घरापासून आरंभिला होता.

## महाराजांचे दातृत्व

महाराज म्हणजे ऐश्वर्य, काटकसर आणि दातृत्व यांचा अतिशय दुर्मिळ आणि क्रांतिकारक 'संगम' होते. महाराजांचे ऐश्वर्य जसे नजरेत भरणारे होते तसेच कुटुंबापासून ते राज्याच्या प्रशासनापर्यंत त्यांनी केलेल्या काटकसरीचे प्रयत्न आज विश्वास बसणार नाही इतके मूलभूत होते. या सगळ्याचा कळस म्हणजे महाराजांचे दातृत्व होय. बडोदा संस्थानचे प्रशासकीय अहवाल पाहिल्यानंतर संस्थानच्या उत्पन्नापैकी सरासरी १५% रक्कम विविध बांधकामावर खर्च केली जात असल्याचे दिसून येते. यामध्ये रस्ते, पाटबंधारे तसेच इतर लोकोपयोगी वास्तूंचा समावेश केला जात होता. शिक्षण संस्थांच्यासाठीदेखील अधिकाधिक खर्च महाराज करत होते. महाराजांनी काही ठळक वास्तू व संस्थांच्या इमारतीवर केलेला खर्च उदाहरणादाखल देत आहे. कंसात दिलेले आकडे लाखात दिले आहेत. फिमेल ट्रेनिंग कॉलेज (०.९), मिडल स्कूल (१.४), म्युझियम (२.६), बडोदा हायस्कूल (२.८), कीर्तीमंदिर (४.१), कलाभवन (५.५), न्यायमंदिर (७.३), बडोदा कॉलेज (८.३), मकरपुरा राजवाडा (१२.८), प्रतापविलास (१२.०), सार्वजनिक बाग (१९.२), ड्रेनेज काम (२५.०), वॉटर वर्क्स (४३.०) आणि लक्ष्मीविलास राजवाडा (५२.२) इ.

आपल्या खाजगी आणि राज्याच्या संपत्तीतून निखळ मानवतावादी दृष्टीकोनातून फक्त भारतातच नव्हे तर जगभर जनकल्याणाच्या कामाला महाराजांनी दिलेल्या भक्कम आर्थिक आधाराला जगाच्या इतिहासात तोड नाही. याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे १८९८ ते १९०० या दोन वर्षांतील दुष्काळ कामांचा खर्च एक कोटी रुपयांहून अधिक झाला होता. एवढी रक्कम उभारताना सयाजीरावांनी खानगी खात्यातूनसुद्धा आर्थिक मदत केली. दिवाणखाण्याच्या मुख्यप्रवेशद्वारी सोन्याचे दोन सिंह होते. ते वितळून सोने विकले. ती रक्कम दुष्काळी कामाकडे वळवली. भारतात अनेक कल्याणकारी राजे झाले. परंतु दातृत्वाची ही परिसीमा गाठणारे सयाजीराव एकटेच.

## ज्ञान आणि संपत्तीचा दुर्मिळ संयोग

राजा आणि ऐश्वर्य ही जणू जुळी भावंडेच होत. जगभर राजांचे राजवाडे, ऐश्वर्यातील जगणे आणि त्यांच्या संपत्तीचे किस्से आपण अनेकदा ऐकलेले असतात. परंतु महाराजांच्या ऐश्वर्याला असणारी भरघोस दातृत्वाची उदार किनार त्यांना इतर राजांपासून वेगळी करणारी आणि सर्वोच्च उंचीवर नेऊन ठेवणारी ठरते. या राजवाड्याच्या वैभवाच्या चर्चेबरोबर ती समजून घेणे आज फार गरजेचे आहे. कारण आज लोकशाहीत लोकप्रतिनिधी आपण देशाचे मालक आहोत या धुंदीत एखाद्या सम्राटालाही लाजवेल अशा थाटात वावरत आहेत. जनतेच्या सुख-दुःखाशी त्यांचे कोणतेच नाते नाही हे त्यांच्याकडे पाहिले तरी लक्षात येते.

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी बांधलेला लक्ष्मीविलास राजवाडा म्हणजे त्यांचा ध्येयवाद, विशाल दृष्टी आणि संपन्नतेचे प्रतीक आहे. परंतु अगदी सुरुवातीपासूनच या ऐश्वर्याला वैराग्याचे अधिष्ठान होते. महात्मा गांधींनी 'विश्वस्त' ही संकल्पना मांडण्याअगोदर महाराज ती शब्दश: जगले होते. राज्यसूत्रे हाती घेतली तेव्हा बडोदा संस्थान आर्थिकदृष्ट्या संकटात होते. महाराजांनी हे संस्थान कल्पकतेने, स्वकष्टाने, सर्वक्षेत्रातील ज्ञानी लोकांच्या सहकार्याने तसेच आर्थिक व्यवस्थापनाचा मानदंड निर्माण करून जगातील पहिल्या दहा श्रीमंतांच्या यादीत नेऊन ठेवले. हे सर्व करत असताना मनाने मात्र 'आपण या संपत्तीचे विश्वस्त आहोत' हीच धारणा ते जगले. यासंदर्भात पुढील उदाहरण बोलके आहे. १९३६ मध्ये सयाजीराव महाराजांच्या राज्याधिकार हीरकमहोत्सवानिमित्त 'सयाजीराव तिसरे डायमंड ज्युबिली ट्रस्ट फंडा'ची स्थापना महाराजांनी केली. याद्वारे समाजविकास आणि मुख्यत: आदिवासी आणि अस्पृश्य यांच्या उन्नतीसाठी एक कोटी रुपयाचा निधी महाराजांनी आपल्या खाजगी फंडातून राखून ठेवला होता.

राजर्षी ही पदवीसुद्धा महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करताना फारच छोटी वाटते. कारण महाराजांनी ज्या-ज्या क्षेत्रात काम केले त्या-त्या क्षेत्रातील आदर्शांच्या प्रस्थापित मानदंडांच्या कक्षा इतक्या विकसित केल्या की त्यातून नवे मानदंड निर्माण झाले. महाराजांच्या सेवेत असणारे महत्त्वाचे

अधिकारी रामचंद्रराव माने-पाटील यांच्या संदर्भातील एक आठवण यादृष्टीने फारच लक्षवेधी आहे. या चर्चेचा शेवट आपण त्या आठवणीने करूया.

लक्ष्मीविलास राजवाड्याच्या लॉनवर एका सकाळी महाराज कागदपत्र पाहत होते. ते पाहून झाल्यावर तेथून दिसणाऱ्या राजवाड्याकडे बघत जवळच उभ्या असलेल्या रामचंद्रराव माने पाटलांना सयाजीराव म्हणाले, “माने, एखादे वेळी असे वाटते की, एवढा मोठा राजवाडा आम्हाला काय करावयाचा आहे? येथेच एखादा बंगला बांधून आपण त्यात राहावे व या राजवाड्याचे म्युझियम किंवा लायब्ररीत रूपांतर करून आमच्या प्रजेला त्याचा उपयोग करून द्यावा.”

●●●

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूस्कर - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
 - धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
 - धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
 - सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
 - दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
 - डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
 - सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
 - पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
 - बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
 - बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



**❒ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**<u>मराठी :</u>**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**<u>English</u>**

- Spechess & Adresses : 2 Books
- Letters : 4 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- Administration : 1 Books
- World Tour Reports : 3 Books
- Education Reforms : 3 Books
- Biographies : 5 Books
- Total English Books : 20

**<u>हिन्दी :</u>**

- सयाजीराव का लेखन : १
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- सयाजीराव जीवनी : २
- भाषण संग्रह : २
- पत्र संग्रह : ३
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद

कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४